रत्नागिरी । गुरुवार, २४ ऑक्टोबर २०१३ । किंमत ₹ तीन । पाने २४ (१२+४+८)

सकाळ

# 'मुकुल माधव'तर्फे महिलांना संगणक प्रशिक्षण

**सकाळ वृत्तसेवा**

रत्नागिरी, ता. २३ : सर्व वयाच्या महिलांना कॉम्प्युटर कोर्समध्ये समाविष्ट करून घेऊन त्यांच्या सक्षमीकरणाचा मुकुल माधव फाऊंडेशनचा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे, असे गौरवोद्‌गार योगिता टायपिंग व कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटचे संचालक राहुल पंडित यांनी काढले.

मुकुल माधव फाउंडेशन आणि योगिता कॉम्प्युटर्सच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या कॉम्प्युटर कोर्सच्या प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी फिनोलेक्सचे जनसंपर्क अधिकारी अशोक तातुगडे, श्रीमती पूजा प्रभू, प्रशिक्षक सौरभ आठल्ये, रवींद्र मायंगडे आदी उपस्थित होते. श्री. पंडित म्हणाले, "आज प्रत्येक घरात टीव्ही सेट आहेत. तसेच काही वर्षांनी प्रत्येक घरात कॉम्प्युटर दिसतील. त्यामुळे कॉम्प्युटर शिकणे ही काळाची गरज आहे. महिलांनीही याचे प्रशिक्षण घेण्यासाठी पुढे आले पाहिजे." या उपक्रमातून वीस महिलांनी संगणकीय प्रशिक्षण घेतल्याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. राधा करमरकर यांनी केले, तर आभार सौ. अस्मिता चोप्रा यांनी मानले. मुकुल माधव फाउंडेशनतर्फे १९ नोव्हेंबरपासून संगणकीय अभ्यासक्रमाची दुसरी बॅच सुरू करण्यात येणार आहे. त्याचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले.



**रत्नागिरी : मुकुल माधव फाउंडेशनतर्फे आयोजित संगणकीय प्रशिक्षण वर्गात सहभागी महिला. सोबत फिनोलेक्सचे जनसंपर्क अधिकारी अशोक तातुगडे, राहुल पंडित, श्रीमती पूजा प्रभू, प्रशिक्षक सौरभ आठल्ये, रवींद्र मायंगडे आदी.**